**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३६/२०१६-१७/२२० दिनांक: २६-१२-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ३६/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सादिक म्हमूलाल मुल्ला :<br>मु. पो. ढवळी<br>ता. तासगांव, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग सांगली | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग तासगांव-२ | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. नि.बा. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री सादीक म्हमूलाल मुल्ला ,रा. ढवळी ता. तासगांव जि. सांगली (ग्राहक क्रमांक २८१९५०५५५८२२) यांनी त्यांच्या गट क्र. २६९/अ या शेत जमिनीमध्ये विहीर खोदून दि. १२-०७-२०१६ रोजी वितरण कंपनीकडे कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज सादर केला. त्यांनी दिनांक १८-०८-२०१६ रोजी रक्कम रु. ५,६५०/- वि.प.यांचेकडे जमा केले. त्यांना वीज जोडणी न मिळाल्यामुळे त्यांनी दि. २८-०९-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक २३-११-२०१६ च्या आदेशाने, वीज जोडणी जेष्ठता यादीप्रमाणे देण्यात येईल असे तक्रारदार यांना कळविले . त्या आदेशाने समाधान झाले नसल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचाकडे गा-हाणे दाखल केले आहे. तक्रारदार यांनी विहीत मुदतीत वीज जोडणी देणेचा आदेश होऊन विलंबा पोटी भरपाई मिळणेची मागणी या मंचाकडे केली आहे.

२) वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री बी. पी. व्हनमाने यांनी लेखी म्हणणे सादर केले आहे. वि.प. यांचे असे म्हणणे आहे की, तक्रारदार यांना वीज कनेक्शन देण्यासाठी ०.२४ कि.मी. (चार खांब) एवढया लघुदाब वाहिनीचे काम करणे आवश्यक आहे. मार्च-२०१३ पर्यन्त ज्या शेतक-यांनी कृषि पंपासाठी वीज जोडणी मिळणेसाठी पैसे भरले आहेत त्यांच्या कामासाठी ठेकेदारांची नियुक्ती केलेली आहे. ३६८ शेतक-यांची प्रतिक्षा यादी प्रलंबित असून त्यामध्ये तक्रारदार यांचा ३५८ वा क्रमांक आहे. जेष्ठता यादीनुसार तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येईल. असा अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेला निर्णय योग्य आहे. असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) या प्रकरणाची सुनावणी दि. २३-१२-२०१६ रोजी मंचासमोर ठेवण्यात आली होती. या मंचाचे सदस्य सचिव श्री खपली हे रजेवर असल्याने श्री बारसिंग कार्यकारी अभियंता यांनी प्रभारी सदस्य सचिव म्हणून काम पाहिले.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार स्वत: हजर होते. त्यांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. त्यांनी त्यांचे प्रतिनिधी श्री आलमशहा मोमीन यांचा लेखी युक्तिवादही दाखल केला आहे. वि.प.तर्फे श्री बी. पी. व्हनमाने उपकार्यकारी अभियंता ,उपविभाग तासगांव-२ यांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. सर्व उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करणेत आले आहे.

४) तक्रारदार यांचे गा-हाणे , उपलब्ध कागदपात्रेआणि तोंडी व लेखी युक्तिवाद यांचा विचार करता या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात आणि त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

(१) तक्रारदार यांना त्यांच्या विनंती प्रमाणे त्यांच्या कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

(२) तक्रारदार यांना, तथाकथित विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही.

(३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) युक्तिवाद आणि कागदपत्रांचा विचार करता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी दिनांक १२-०७-२०१६ रोजी वितरण कंपनीकडे कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज सादर केला आणि दि. २२-०७-२०१६ रोजी फर्म कोटेशन मिळालेनंतर दि. १८-०८-२०१६ रोजी रक्कम रु. २,६५०/- वि.प. यांच्या कार्यालयात भरणा केली. त्यापूर्वी त्यांनी मौजे ढवळी येथील गट क्र. २६९/अ जमिनीत दोन गुंढे क्षेत्रावर विहीर खुदाई केली. तक्रारदार यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते असे त्यांच्या प्रतिनिधीने लेखी युक्तिवादात नमूद केले आहे. म्हणजे त्यांना दि. १८-११-२०१६ पर्यन्त वीज जोडणी मिळावयास पाहिजे होती असे त्यांचे म्हणणे असल्याचे दिसते.

६) तथापि तक्रारदार यांनी वरील प्रमाणे तीन महिन्यांची कथित मुदत संपण्यापूर्वीच म्हणजे दिनांक २८-०९-२०१६ रोजीच अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली . त्या तक्रारीचा निर्णय सदर कक्षाने दि. २३-११-२०१६ रोजी करुन जेष्ठता यादी प्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असा आदेश दिला.

७) वरील परिस्थितीत, तक्रारदार यांना विलंब पोटी प्रति आठवडा भरपाई देता येणार नाही असे या मंचाचे मत आहे.वास्तविक तक्रारदार यांनी ३ महिन्यांची मुदत संपण्याची प्रतिक्षा करावयास पाहिजे होते आणि त्यानंतरच सदर कक्षाकडे तक्रार दाखल करणे योग्य ठरले असते.

याशिवाय स्वतः तक्रारद ार यांनी तोंडी युक्तिवादाचे वेळी, वीज जोडणी लौकर मिळणार असेल तर विलंबाची भरपाई सोडून देत आहे असे निवेदन केले आहे.

८) तासगांव उपविभाग-२ चे अंतर्गत जी जेष्ठता यादी प्रलंबित आहे. त्यामध्ये ३६८ शेतक-यांची नांवे समाविष्ट असून प्रस्तुत तक्रारदार यांचा ३५८ वा क्रमांक आहे.

९) असे असले तरीही कृतिमानके विनियम या मधील तरतूदी या बंधनकारक आहेत. जर विहीत मर्यादेमध्ये वीज पुरवठा देणेत आला नाही तर विलंबापोटी प्रति आठवडा भरपाई मिळणेचा अधिकार ग्राहकाला देणेत आला आहे. वितरण कंपनीस कृतिमानके साध्य करण्यास अडचणी येत असतील तर त्या अडचणीचे निराकरण मा. विद्युत नियामक आयोगाकडूनच करुन घेणे शिवाय वितरण कंपनीस फारसे पर्याय उपलब्ध नाहीत. हे काही अंशी खरे आहे की, ज्या शेतक-यांची नावे जेष्ठता यादीत तक्रारदाराचे अगोदर नोंद आहेत. त्यांचेवर थोडाफार अन्याय झाल्यासारखे वाटेल. परंतु आपल्या हक्कांची व अधिकारांची जाणीव असलेल्या ग्राहकावर अशा तांत्रिक कारणास्तव अन्याय करता येणार नाही.

१०)वरील सर्व परिस्थितीत, तक्रारदार यांची नविन वीज जोडणी मिळणेची मागणी मान्य करता येणासारखी आहे हे स्पष्ट होत आहे. तथापि त्यांना भरपाई मंजूर करता येणार नाही. हे या अगोदर स्पष्ट केले आहे. त्यामुळे तक्रारदार यांचा प्रस्तुतचा गा-हाणे अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर करता येईल असे या मंचाचे मत आहे.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री सादिक म्हमूलाल मुल्ला रा. ढवळी ता. तासगांव जि. सांगली यांना त्यांच्या मागणी प्रमाणे कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी नियमानुसार, दिनांक ३१.०३.२०१७रोजी अगर त्यापूर्वी देणेत यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) तक्रारदार यांची विलंबापोटी भरपाई मिळणेची मागणी अमान्य करणेत येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (नि.बा. बारसिंग) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |